आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
८ जुलै २०२५ - मंगळवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- मुंबई उपनगरात शासकीय जमिनींवर झालेल्या अतिक्रमणाच्या चौकशीसाठी उच्चस्तरीय समिती स्थापन करण्याची उद्योगमंत्र्यांची विधानसभेत घोषणा

- राज्यातल्या गिग वर्कर्सना सामाजिक सुरक्षा देण्यासाठी स्वतंत्र कायदा करणार

- ग्रंथालयांच्या अनुदानात ४० टक्के वाढ करण्याच्या प्रस्तावाला मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांची मान्यता

**आणि**

- राज्याच्या विविध भागात पाऊस, विदर्भात जनजीवन विस्कळीत तर कोकणात शेतीच्या कामांना वेग

**<><><><>**

मुंबई उपनगरातल्या शासकीय जमिनींवर झालेल्या अतिक्रमणाची चौकशी करण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती स्थापन करण्याची घोषणा उद्योगमंत्री उदय सामंत यांनी आज विधानसभेत केली. आमदार योगेश सागर यांनी या भागातल्या अतिक्रमणाबाबत उपस्थित केलेल्या लक्षवेधी सूचनेला ते उत्तर देत होते. मुंबईचे पोलीस आयुक्त, मुंबई उपनगरचे जिल्हाधिकारी, तसंच मुंबईच्या जिल्हाधिकारी यांचा या समितीत समावेश असेल.

अकरावीच्या ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेत सुरुवातीला काही तांत्रिक अडचणी आल्या, मात्र आत्तापर्यंत पाच लाखापेक्षा जास्त विद्यार्थ्यांना त्यांच्या पसंतीचं महाविद्यालय मिळालं असून कोणताही विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहणार नाही, अशी ग्वाही शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी आज विधानसभेत दिली. आमदार अभिमन्यू पवार यांनी उपस्थित केलेल्या लक्षवेधी सूचनेवर आमदार नारायण कुचे यांनी मांडलेल्या मुद्द्याला ते उत्तर देत होते.

नाशिक महापालिकेअंतर्गत ठेकेदारीवर नेमलेल्या कर्मचाऱ्यांच्या खात्यातून ठेकेदार आणि महानगरपालिकेचे अधिकारी बेकायदा पद्धतीने पैसे काढून घेत असल्याच्या तक्रारींची चौकशी वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांमार्फत करू, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी

आज विधानसभेत केली. आमदार देवयानी फरांदे यांनी मांडलेल्या लक्षवेधीला ते उत्तर देत होते. असे प्रकार होऊ नयेत, कर्मचाऱ्यांना त्यांच्या कामाचा पूर्ण मोबदला मिळाला यादृष्टीने योजना तयार करण्यासाठी कामगार विभागाच्या सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्याचं आणि दोन महिन्यांत ही योजना तयार करण्याचे निर्देश त्यांना देण्याचंही त्यांनी जाहीर केलं.

विधानसभेच्या नियमित कामकाजाला सुरुवात झाल्यानंतर प्रश्नोत्तराच्या तासाला सुरुवात होण्यापूर्वी न्यायमूर्ती भूषण गवई यांची भारताच्या सरन्यायाधीशपदी नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचं अभिनंदन करणारा प्रस्ताव विधानसभेनं संमत केला. अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी हा प्रस्ताव मांडला. सभागृहानं एकमतानं तो मंजूर केला.

**<><><><>**

राज्यातील झॉमेटो, स्विगी अशा प्लॅटफॉर्मवर काम करणाऱ्या गिग वर्कर्सची संख्या भविष्यात वाढणार असून, सरकार त्यांच्यासाठी स्वतंत्र कायदे निर्माण करणार असून, त्याच्या मसूद्यावर सध्या काम सुरू असून, त्याद्वारे या कामगारांना सामाजिक सुरक्षा देण्याचा सरकारचा प्रयत्न आहे, अशी माहिती कामगार मंत्री आकाश फुंडकर यांनी विरोधी पक्षांनी, नियम २६० अन्वये मांडलेल्या ठरावाला उत्तर देतांना दिली.

संघटित कामगारांपेक्षा, असंघटित कामगारांची संख्या वाढलेली असून, त्यांच्या कल्याणाकरता राज्यात ६८ व्हर्चुअल बोर्डची रचना प्रस्तावित असून त्या दिशेने त्यांची नोंदणी, त्यांची सामाजिक सुरक्षा यांचा विचार करुन त्यांना न्याय देण्यासाठी काम सुरू असल्याची माहिती, फुंडकर यांनी दिली. बोगस माथाडी कामगारांप्रकरणी, सरकार कुणालाही पाठीशी घालणार नाही. जे कुणी अधिकारी या प्रकरणी दोषी असतील, त्यांची एसआयटीमार्फत चौकशी केली जाईल, याचा पुनरुच्चार फुंडकर यांनी सभागृहात केला. गिरणी कामगारांना घरे देण्याची अंतिम कारवाई गृहनिर्माण धोरणाच्या अधीन असून, पात्र लाभार्थी ओळखून त्याबाबतची कारवाई कामगार विभागानं पूर्ण केल्याची माहितीही फुंडकर यांनी दिली.

**<><><><>**

न्यायमूर्ती भूषण गवई यांची देशाच्या ५२व्या सरन्यायाधीशपदी नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचं अभिनंदन करणारा प्रस्ताव विधान परिषदेत संमत झाला. सभापती राम शिंदे यांनी हा प्रस्ताव सादर केला. सभागृहानं तो एकमताने मंजूर केला.

<><><><>

ठाणे जिल्ह्यात मीरा भाईंदर इथं हिंदी भाषिक व्यापाऱ्यांच्या मोर्चानंतर महाराष्ट्र नवनिर्माण सेना आणि मराठी एकीकरण समिती यांच्या वतीनं मोर्चाचं आयोजन करण्यात आलं होतं, मात्र मोर्चा मार्गाचा आंदोलकांनी धरलेला आग्रह कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण करु शकत होता म्हणून पोलिसांनी परवानगी नाकारली, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी दिली. ते आज विधानभवन परिसरात वार्ताहरांशी बोलत होते. कायदा आणि सुव्यवस्था बिघडवण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न करणं योग्य नसल्याचं मुख्यमंत्री म्हणाले.

दरम्यान, पोलिसांनी परवानगी नाकारल्यानंतरही मोर्चेकरी जमा झाले असून, पोलिसांनी अनेकांना ताब्यात घेतल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

<><><><>

सरन्यायाधीश भूषण गवई यांचा आज मुंबईत विधान भवनात सत्कार होत आहे. विधान भवनाच्या मध्यवर्ती सभागृहात पहिल्यांदाच देशाच्या सरन्यायाधीश यांचा सत्कार होत आहे. सत्कारानंतर भारताची राज्य घटना या विषयावर ते उपस्थितांना संबोधित करतील.

<><><><>

ग्रंथालयांच्या अनुदानात ४० टक्के वाढ करण्याच्या प्रस्तावाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मान्यता दिली आहे. हा प्रस्ताव तातडीने वित्त विभागाकडे पाठवण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. राज्यातल्या अर्धशतक पार केलेल्या सार्वजनिक ग्रंथालयांना प्रोत्साहनपर विशेष अनुदान मंजूर करायलाही मान्यता मिळाली आहे.

राज्यातल्या विद्यापीठं आणि अशासकीय महाविद्यालयांमधल्या रिक्त पदांची भरती, शासन अनुदानित अभियांत्रिकी संस्थांमध्ये १०० टक्के पदभरती या मागण्यांनाही मुख्यमंत्र्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. विधानभवनात उच्च आणि तंत्रशिक्षण विभागाच्या आढावा बैठकीत ते बोलत होते.

<><><><>

वाहतूक क्षेत्रामुळे देशातल्या प्रदुषणात चाळीस टक्के भर पडते. त्यामुळे या क्षेत्राने पर्यावरणाच्या बाबतीत सर्वाधिक जबाबदारी निभावली पाहिजे, असं प्रतिपादन केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी आज केलं. फरिदाबाद नोएडा आंतरराष्ट्रीय विमानतळ कॉरिडॉरवर एक पेड माँ के नाम या मोहिमेच्या दुसऱ्या टप्प्याची सुरुवात आज झाली त्यावेळी ते उपस्थितांना संबोधित करत होते.

<><><><>

रिओ द जिनेरोमधील दोन दिवसांच्या ब्रिक्स शिखर परिषदेनंतर, ब्राझील दौऱ्याच्या दुसऱ्या टप्प्यात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी काल ब्राझिलियामध्ये दाखल झाले. ब्राझीलच्या संरक्षणमंत्र्यांनी त्यांचं स्वागत केलं. ब्राझिलचे अध्यक्ष लुइझ इनासियोलुला दा सिल्वा यांच्यासमवेत ते आज व्यापार, संरक्षण, ऊर्जा, अंतराळ, तंत्रज्ञान, कृषी, आरोग्य आदी विविध मुद्द्यांवर चर्चा करणार आहेत.

<><><><>

विम्बल्डन टेनिस स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीच्या सामन्यांना आजपासून सुरुवात होत आहे. उपांत्यपूर्व फेरीच्या, पुरुष एकेरीत जागतिक क्रमवारीतला दुसऱ्या क्रमांकाचा खेळाडू कार्लोस अल्काराझ याचा सामना ब्रिटनच्या कॅमरन नोरी बरोबर होईल तर जागतिक क्रमवारीतला पाचव्या क्रमांकाचा खेळाडू टेलर फ्रिट्ज चा सामना खाचानोवा याच्याबरोबर होईल.

<><><><>

राज्यात अनेक जिल्ह्यात जोरदार पाऊस सुरु आहे.

**गोंदिया** जिल्ह्यात दोन दिवसांपासून पावसाची संततधार सुरू असून वैनगंगा नदीच्या पाणी पातळीत वाढ झाली आहे. काल दिवसभर झालेल्या पावसामुळे तिरोडा तालुक्यात एका व्यक्तीचा मृत्यू झाला. पावसामुळे  जिल्ह्यातले २१ मार्गांवरची वाहतूक ठप्प झाल्यानं विद्यार्थ्यांची गैरसोय टाळण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी आज सर्व शाळांना सुट्टी जाहीर केली.

**गडचिरोली** जिल्ह्यातही रात्रीपासून संततधार पाऊस सुरु असून, नद्या- नाल्यांना पूर आल्यानं १६ मार्गांवरील वाहतूक ठप्प झाली आहे. दरम्यान गोसेखुर्द धरणातून होणार

पाण्याचा विसर्ग टप्प्याटप्प्यानं वाढवण्यात येणार आहे. त्यामुळे नदीकाठवरच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

**भंडारा** जिल्ह्यात तुमसर तालुक्यातल्या तामसवाडी इथं एका गर्भवती महिलेला रुग्णालयात नेण्यासाठी येणारी रुग्णवाहिका पावसामुळे झालेल्या चिखलात अडकली. त्यामुळे या महिलेला रुग्णवाहिकेपर्यंत पायीच जावं लागलं.

पावसामुळे अनेक ठिकाणी जनजीवन विस्कळीत झालं असलं तरीही **रत्नागिरी** जिल्ह्यात झालेल्या समाधानकारक पावसामुळे शेतकरी सुखावले असून शेतीच्या कामांना वेग आला आहे.

//<><><><>//